<u>विभागीय चौकशी</u>

श्री. डी. एस. तायडे (सेवानिवृत्त),
तत्कालीन लागवड अधिकारी,
सामाजिक वनीकरण विभाग, अकोला.

महाराष्ट्र शासन
महसूल व वनविभाग
शासन आदेश क्रमांक:-चौकशी-२०२५/प्र.क्र.२२/वने-१२
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड,
मंत्रालय, मुंबई-४०००३२.
दिनांक :- ११ सप्टेंबर, २०२५.

संदर्भ :- १) वनसंरक्षक, सामाजिक वनीकरण वृत्त, अमरावती यांचे ज्ञापन क्र.कक्ष-४/आस्था-अ/१६११/२०१५-१६, दि.२८/०२/२०१७.

२) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (प्रशासन-दुय्यम संवर्ग), म. रा., नागपूर यांचे पत्र क्र.कक्ष १०(अ)-१/वि.चौ/प्र.क्र.५(अमरावती)/२०२४-२५/४८१, दि.२०/०१/२०२५.

३) मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, खंडपीठ नागपूर यांचे मुळ अर्ज क्र.६६७/२०२३ मधील दि.३०/०९/२०२४ रोजीचे आदेश.

<u>आदेश</u>

ज्याअर्थी, श्री. डी. एस. तायडे, तत्का. लागवड अधिकारी, सामाजिक वनीकरण विभाग, अकोला या पदावर कार्यरत असतांना त्यांनी रस्ता दुतर्फा लागवड, नाविन्यपुर्ण योजनेंतर्गत घेण्यात आलेल्या रोपवनातील खडयांची पुर्नभरण ही गाळाच्या मातीने / काळया मातीने न करता, खडक व मुरुमाने पुर्नभरण केली. तसेच सदर कामामध्ये मरअळ लागवड करण्यात आली नसून मग्रारोहयो अंतर्गत सन २०१५-१६ चे अंकेक्षणाकरीता सनदी लेखापाल यांना परिक्षणाकरीता अभिलेख सादर केला नाही. श्री. डी. एस. तायडे, तत्का. लागवड अधिकारी, सामाजिक वनीकरण विभाग, अकोला यांची सदर पदावरुन बदलीने वनक्षेत्रपाल (वन्यजीव), बुलढाणा या ठिकाणी पदस्थापना करण्यात आली असता, त्यांनी त्यांच्याकडे असलेला संपुर्ण कार्यभार हस्तांतरण केला नाही. तसेच, सदर पदावर कार्यरत असलेल्या कालावधीची दैनंदिनी सादर न केल्याने त्यांच्याविरुध्द वनसंरक्षक, सामाजिक वनीकरण, अमरावती यांनी दि.२८/०२/२०१७ च्या ज्ञापनान्वये महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ च्या नियम ८ अंतर्गत दोषारोप बजावून विभागीय चौकशीची कार्यवाही करण्यात आली.

ज्याअर्थी, श्री. डी. एस. तायडे (सेवानिवृत्त), तत्कालीन लागवड अधिकारी, सामाजिक वनीकरण विभाग, अकोला यांचे प्रकरणी सविस्तर चौकशी होऊन, प्रादेशिक विभागीय चौकशी अधिकारी, अमरावती विभाग, अमरावती यांनी त्यांच्या अहवालात दोषारोप क्र. १ व ३ सिध्द होत नाही तर दोषारोप क्र.२ अंशत: सिध्द होतो, असे निष्कर्ष नोंदविले आहे आणि सदर निष्कर्षास मुख्य

Scanned by CamScanner

वनसंरक्षक (प्रा.), अमरावती व वनसंरक्षक, सामाजिक वनीकरण, अमरावती यांनी सहमती दर्शवून श्री. डी. एस. तायडे (सेवानिवृत्त), तत्कालीन लागवड अधिकारी, सामाजिक वनीकरण विभाग, अकोला यांच्या सेवानिवृत्ती वेतनातून दरमहा १ टक्के इतकी रक्कम एक वर्षासाठी कपात करण्याबाबतचा शिक्षा प्रस्ताव अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (प्रशासन दुय्यम संवर्ग), नागपूर यांना सादर केला.

ज्याअर्थी, श्री. डी. एस. तायडे (सेवानिवृत्त), तत्कालीन लागवड अधिकारी, सामाजिक वनीकरण विभाग, अकोला यांनी त्यांच्याविरुध्द विभागीय चौकशी प्रलंबित असल्याने सेवानिवृत्तीचे रोखून ठेवलेले लाभ मिळविण्यासाठी मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, खंडपीठ नागपूर येथे मूळ अर्ज क्र.६६७/२०२३ दाखल केला असून, मा. न्यायाधिकरणाने दि.३०/०९/२०२४ च्या आदेशान्वये श्री. तायडे यांच्याविरुध्द दि.२८/०२/२०१७ रोजी सुरु करण्यात आलेली विभागीय चौकशीची कार्यवाही रद्दबातल ठरविली असून श्री. तायडे यांना तीन महिन्यात सेवानिवृत्ती विषयक लाभ अदा करण्याचे आदेश दिले आहेत.

त्याअर्थी, श्री. डी. एस. तायडे (सेवानिवृत्त), तत्कालीन लागवड अधिकारी, सामाजिक वनीकरण विभाग, अकोला यांच्या विरुध्द दि.२८/०२/२०१७ रोजीच्या ज्ञापनान्वये सुरु करण्यात आलेली महाराष्ट्र नागरी सेवा (शित्त व अपील) नियम, १९७९ च्या नियम ८ अंतर्गत विभागीय चौकशीची कार्यवाही रद्द करुन त्यांना दोषारोपातून दोषमुक्त करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(मंजुषा सोनजे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

श्री. डी. एस. तायडे, तत्का. लागवड अधिकारी, सामाजिक वनीकरण विभाग, अकोला.
(द्वारा- अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (प्रशासन-दुय्यम संवर्ग), महाराष्ट्र राज्य, नागपूर.)

प्रतिलिपी-

१) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख) म. रा. नागपूर.
२) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (प्रशासन-दुय्यम संवर्ग), म. रा. नागपूर.
३) मुख्य वनसंरक्षक (प्रा.), अमरावती.
४) वनसंरक्षक, सामाजिक वनीकरण, अमरावती.
५) कक्ष अधिकारी (वने-४), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
६) निवडनस्ती (वने-१२), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.

Scanned by CamScanner